*Annexure XIIB (2), (Vide Article - 12.05)*

क्र. विसप्र-८८९/प्र. क्र. २५५/म-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट, १९९०.

प्रति,

वनसंरक्षक,
यवतमाळ वनवृत्त,
यवतमाळ.

विषय : विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ८७९१५ बाबत.

संदर्भ : आपले पत्र क्र. कक्ष-२/दक्षता/विसप्र/६७०/८९-९०,
दिनांक १६.५.१९८९.

संदर्भाधीन पत्रान्वये विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ८७९१५ च्या माहितीमध्ये श्री. महादेव तुकाराम पेंदोर यांच्या जमिनीवरील झाडांच्या मालकी हक्काबाबतचा मुद्दा आपण उपस्थित केला होता.

२. या प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, मौजे मोरगांव येथील स.क्र. ३८ मधील जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर श्री. महादेव पेंदोर यांची भोगवटदार वर्ग-२ म्हणून नोंद करण्यात आलेली असल्याने सदर जमिनीवरील झाडांवर त्यांचे मालकी हक्क प्रस्थापित होतात, असा निर्णय महसूल विभागाने घेतलेला आहे. प्रकरणी खुलासा करण्यात येतो की, कायद्यान्वये वन जमिनी ज्या व्यक्तिंना कसण्यासाठी दिलेल्या होत्या त्या व्यक्तिंना सदर जमिनीसंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ खालील "भोगवटदार वर्ग-२" हा दर्जा दिलेला आहे. या अधिनियमातील कलम २९[२] मधील तरतूदीनुसार अशा जमिन धारकांना त्या जमिनीवरील झाडांवर हक्क प्राप्त झालेला आहे.

३. उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता प्रश्नांकित जमिनीवरील झाडे-यावर हक्क श्री. महादेव तुकाराम पेंदोर यांना प्राप्त होतो. तेव्हा उपरोक्त खुलाशानुसार प्रस्तुत प्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

[ श्री. टी. गिरि ]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

...